## निवडक

### डिचोलीत रविवारी मंगलयात्रा

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २७** : सार्वजनिक गुढीपाडवा उत्सव समिती डिचोली तर्फे या वर्षीचा गुढीपाडवा उत्सव रविवार दि. ३० रोजी विविध कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष उद्धव कशाळीकर व समिती पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डिचोली पत्रकार संघाच्या कक्षात आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेला कशाळीकर यांच्यासह सचिव वनश्री चोडणकर, कार्यवाह आश्विनी पटवर्धन, देविदास जांभळे ,मंदार गावडे , नितीन माळगांवकर यांची उपस्थिती होती.

पहाटे ५:१५ वाजता श्री शांतादुर्गा हायस्कूल येथून मंगलयात्रेला प्रारंभ होणार आहे. मंगलयात्रा श्री शांतादुर्गा हायस्कूल कडून जुना बस स्टँड येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन पालिका मार्गे आतील पेठ सोनपेठ मार्गे चव्हाठा येथे जाऊन श्री शांतादुर्गा हायस्कूल पटांगणात येईल. शांतादुर्गा हायस्कूल पटांगणात सकाळी ६:३६ वाजता गुढीरोहण होणार आहे. या वेळी हिंदू जन जागृती समिती गोवा राज्य संघटक सत्यविजय नाईक हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. संध्याकाळी ५ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात नृत्य,लोककला, आदी कार्यक्रमातून महिला , लहान मुले आदींचा कलाविष्कार सादर होणार आहे. सर्वांनी मंगल यात्रा तसेच संपूर्ण कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहनही या पत्रकार परिषदेतून करण्यात आले आहे.

---------------------------------

### नानोड्यात उद्या 'सुखी मी या संसारी '

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २७** : नानोडा – डिचोली येथील शिमगोत्सवानिमित्त शुक्रवार, दि. २८ रोजी रात्री १०.३० वा. शांतादुर्गा हौशी नाट्यमंडळ कळंगुट ग्रामस्थांतर्फे आत्माराम भगत लिखित तीन अंकी मराठी नाटक ' सुखी मी या संसारी ' होईल. दि. २९ रोजी दुपारी महाप्रसाद , त्यानंतर पाच वाजता घोडेमोडणी, रात्री ७ वा. महाप्रसाद, देवीची पालखीतून मिरवणूक, नंतर 'डरने का नही' हे नाटक होईल.

# वेळसांव जमीन वाद; ग्रामस्थ आणि रेल्वे प्रशासन आमनेसामने

## जमिनीच्या मालकीच्या वादावरून पुन्हा संघर्ष उफाळला | पुढील सुनावणी १५ एप्रिल रोजी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७** : मडगाव येथील सर्वेक्षण आणि भूमी अभिलेख निरीक्षक यांच्या न्यायालयात वेळसाव –पाळे –आरोसी मधील जमिनीच्या मालकीच्या वादावरून स्थानिक ग्रामस्थ आणि दक्षिण पश्चिम रेल्वे यांच्यातील संघर्ष पुन्हा उफाळला आहे. दक्षिण पश्चिम रेल्वेने अखेर त्यांच्या जमिनीच्या मालकीच्या दाव्यांसंदर्भात अधिकृत उत्तर सादर केले आहे. मात्र, गोयचो एकवोंट संघटनेचे सरचिटणीस ओलेन्सियो सिमोईस यांनी यावर आक्षेप घेत, हे उत्तर अपुरे असल्याचे सांगितले. त्यांनी स्थानिकांना त्यांच्या उत्तरासाठी अधिक वेळ देण्याची मागणी केली असून, पुढील सुनावणी १५ एप्रिल रोजी होणार आहे.

ओलेन्सियो सिमोईस यांनी सांगितले की, दक्षिण पश्चिम रेल्वेने कॅडस्ट्रल प्लॅनच्या आधारावर त्यांचा दावा मांडला असला तरी वेळसावचा कॅडस्ट्रल प्लॅनच अभिलेखातून गायब आहे. त्यामुळे दक्षिण पश्चिम रेल्वेने नेमक्या कोणत्या दस्तऐवजांच्या आधारे हा दावा केला, याबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे. तसेच, रेल्वेने त्यांच्या उत्तरासोबत कॅडस्ट्रल प्लॅन संलग्न केला नसल्याने हा मुद्दा अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे.



संग्रहित छायाचित्र

सामान्य नागरिकांना त्यांच्या जमिनीच्या मालकीचा पुरावा सिद्ध करण्यासाठी विविध सरकारी प्रक्रियांतून जावे लागते, तर दुसरीकडे रेल्वेसारख्या प्रकल्पांना अधिकाऱ्यांचा मोकळा पाठिंबा मिळतो. हा दुजाभाव ग्रामस्थांसाठी अन्यायकारक आहे, असे सिमोईस यांनी सांगितले.

ग्रामस्थांनी आरोप केला की, रेल्वेच्या कामाविरोधात तक्रार केल्यास पोलिस त्यांची बाजू न ऐकता उलट त्यांना अटक करण्याची धमकी देतात. स्थानिकांना त्यांच्या जमिनीवरील हक्कासाठी संघर्ष करावा लागत असून, पोलिसांकडून रेल्वेला मोकळे रस्ते करून देण्याचा प्रयत्न केला जातो.

जीईचे संस्थापक ऑरव्हिल डोराडो रॉड्रिग्ज यांनी दक्षिण पश्चिम रेल्वे च्या कामांमुळे होणाऱ्या संभाव्य धोक्यांवर प्रकाश टाकला. त्यांच्या म्हणण्यानुसार, रेल्वेच्या ट्रॅकच्या दोन्ही बाजूंना केलेल्या उंचीवाढीमुळे अनेक जुन्या जलमार्ग आणि जलनिःसारण प्रणाली नष्ट झाल्या आहेत. याचा परिणाम म्हणून पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होऊ शकते. रेल्वेने घरांसमोरील जमिनीची उंची एवढी वाढवली आहे की, ती थेट कंपाऊंड भिंती आणि गेटच्या समान झाली आहे. त्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या घरात पाणी शिरण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे, असे रॉड्रिग्ज यांनी सांगितले.

प्राईमवाडा येथील ग्रामस्थांनी सांगितले की, रेल्वेच्या कामामुळे त्यांच्या घरांच्या मुख्य प्रवेशद्वारांना अक्षरशः वेढा घालण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना शेजाऱ्यांच्या मालमत्तेतून बाहेर पडण्याची वेळ आली आहे. तसेच, घरांसमोर उभ्या असलेल्या गाड्या रेल्वेने कोणत्याही अधिकृत सूचना न देता हलवल्या असल्याचा आरोप करण्यात आला आहे. आरोसीमधील स्थानिकांनी सांगितले की, रेल्वेने मोठ्या प्रमाणावर चिखल टाकल्यामुळे दरीतील झाडे खराब झाली आहेत. तसेच, अनेक झाडे अंदाधुंद तोडण्यात आली आहेत. मोलो येथील स्थानिकांनी प्रश्न उपस्थित केला की, जेव्हा हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे, तेव्हा रेल्वेने सर्वेक्षण मालकी कागदपत्रांमध्ये त्यांचे नाव कसे नोंदवले ?त्यांनी हेही नमूद केले की, मोलो येथे रेल्वे आणि स्थानिकांमध्ये संघर्ष सुरू असताना दक्षिण पश्चिम रेल्वेने कामाचा वेग अधिकच वाढवला आहे.

# मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड मानवहत्येपेक्षा गंभीर

## सर्वोच्च न्यायालयाकडून गंभीर टिप्पणी

**नवी दिल्ली, दि. २७** : मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड ही मानवहत्येपेक्षाही गंभीर आहे, अशी तीव्र टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने करत वनसंवर्धन कायद्यांमध्ये सातत्याने शिथिलता आणणाऱ्या केंद्र सरकारसाठी आणि विकासाच्या नावाखाली जंगलांचा विध्वंस करणाऱ्या राज्यांसाठी ही 'ताकीद ' ठरावी, असे पर्यावरणतज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.



सुरक्षित ताज ट्रॅपेझियम झोनमध्ये ४५४ झाडे तोडणाऱ्या एका याचिकाकर्त्याची याचिका फेटाळताना, न्यायालयाने स्पष्ट शब्दांत पर्यावरण रक्षणाच्या गरजेवर भर दिला. पर्यावरणविषयक प्रकरणांमध्ये कोणतीही दयामाया दाखवू नये. मोठ्या प्रमाणावर झाडे तोडणे हे मानव हत्या करण्यापेक्षाही गंभीर आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. पर्यावरणतज्ज्ञांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या कठोर भूमिकेचे स्वागत केले असले तरी सरकारे हा इशारा गांभीर्याने घेतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

वनसंरक्षण कायद्यांमध्ये सातत्याने शिथिलता आणणाऱ्या केंद्र सरकारसाठी ही स्पष्ट इशारा आहे,असे साउथ एशिया नेटवर्क ऑन डॅम्स, रिव्हर्स अँड पीपल या संस्थेचे भीमसिंह रावत यांनी सांगितले. त्यांनी हिमालयातील भूगर्भीयदृष्ट्या नाजूक आणि हवामानदृष्ट्या संवेदनशील राज्यांमधील परिस्थितीबाबत विशेष चिंता व्यक्त केली. जलविद्युत प्रकल्प, धरणे, महामार्ग, बोगदे आणि रेल्वे यांसारख्या मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे हजारो हेक्टर जंगल नष्ट झाले आहे. परिणामी, आपत्तींची तीव्रता आणि जीवितहानीत वाढ झाली आहे,असे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादवयांनी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०१४–१५ पासून गेल्या दहा वर्षांत १,७३४ चौ. कि.मी. वनक्षेत्र विकास प्रकल्पांसाठी वळवण्यात आले आहे, जे दिल्लीच्या भौगोलिक क्षेत्रापेक्षा अधिक आहे. तसेच, जुलै २०२३ मध्ये केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी संसदेत सांगितले की, २०१९ पासून पाच वर्षांत ९५७.२५ चौ. कि.मी. वनक्षेत्र इतर वापरासाठी हस्तांतरित करण्यात आले आहे. याशिवाय, याच कालावधीत देशभरातील राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्यांमध्ये ८८१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

उत्तराखंडमधील चार धाम ऑल–वेदर रोड प्रकल्पाचे उदाहरण देत, न्यायपालिका देखील जंगलांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप साउथ एशिया नेटवर्क ऑन डॅम्स, रिव्हर्स अँड पीपल या संस्थेचे भीमसिंह रावत यांनी केला.

पर्यावरणतज्ज्ञ आणि पीपल फॉर अरावलीस संस्थेच्या संस्थापक सदस्य नीलम अहलुवालिया यांनी भारताचा हवामान बदलाच्या दृष्टीने वाढता असुरक्षिततेचा धोका स्पष्ट केला. भारत तीव्र उष्णतेच्या लाटा, हिमनदी तलाव फुटण्याच्या घटना अशा नैसर्गिक आपत्तींचा सामना करत आहे. आपल्या जंगलांचा आणि नैसर्गिक परिसंस्थेचा विध्वंस करून आपण आपली एकमेव संरक्षक ढाल नष्ट करत आहोत. ग्रेट निकोबार, हसदेव, ओडिशा, ईशान्य भारत आणि अरावली येथे झपाट्याने वृक्षतोड सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, विकास आणि पर्यावरण संवर्धन यामध्ये समतोल राखण्यासाठी कठोर धोरणे आणि जबाबदार नियोजन आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# सायबर सुरक्षा आणि पायाभूत सुविधांवर भर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७** : राज्य सरकारने २०२५–२६ च्या अर्थसंकल्पात गोवा पोलिस विभागासाठी १,१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मागील वर्षाच्या ९४८.८३ कोटी रुपयांच्या तुलनेत ही वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बुधवारी विधानसभेत अर्थसंकल्प सादर करताना विविध सुरक्षा उपाययोजनांची घोषणा केली.

मुख्यमंत्री सावंत यांनी सायबर सुरक्षेत सुधारणा करण्यासाठी उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची तसेच राज्य न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेच्या बळकटीकरणाची घोषणा केली. त्यांनी स्पष्ट केले की, गुन्हेगारी तपास अधिक सक्षम करण्यासाठी गोवा पोलिसांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि मशीन लर्निंगवर आधारित प्रयोगशाळा कार्यान्वित केली आहे. यामुळे गुन्ह्यांचा शोध घेणे आणि प्रकरणे जलदगतीने सोडवणे शक्य होईल. याशिवाय, ऑनलाइन कट्टरतावाद व अतिरेकी प्रचार रोखण्यासाठी रॅडिकल कंटेंट ॲनालायझर' विकसित करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी गोवा वाहन प्रमाणीकरण प्रणाली सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रणालीद्वारे चेकपोस्टवर वाहनांची आवश्यक कागदपत्रे डिजिटल स्वरूपात पडताळल्यानंतर एक 'क्यूआर ' कोड जारी केला जाईल. परिणामी, वारंवार तपासणी टाळली जाऊन प्रवाशांना अधिक सोय मिळेल. तसेच, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी व्यापक भाडेकरू पडताळणी मोहिमेची अंमलबजावणी करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. गोवा पोलिसांसाठी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. यामध्ये पणजी येथे नवीन पोलिस मुख्यालयासाठी ४५.६२ कोटी रुपये, पेडणे मधील तेरेखोल सागरी पोलिस स्टेशनसाठी ५२.१८ कोटी रुपये, फातोर्डा पोलिस स्टेशनच्या नवीन इमारतीसाठी १२.०१ कोटी रुपये, मायना – कुडतरी पोलिस स्टेशनसाठी १५.९७ कोटी रुपये, सांगे पोलिस स्टेशनसाठी १०.६८ कोटी रुपये सत्तरीतील – केरी येथे पोलिस चौकीसाठी २.९७ कोटी रुपये आणि तळपण येथे नवीन कोस्टल सिक्युरिटी पोलिस स्टेशनसाठी १.७२ कोटी रुपये यांचा समावेश आहे. चांदोर येथे नवीन पोलिस स्टेशन स्थापन करण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला आहे. त्याचबरोबर संपूर्ण राज्यात क्यूआर – आधारित प्रणालीचा विस्तार करून वाहतूक अधिक सुलभ करण्याच्या उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील अग्निशामक आणि आपत्कालीन सेवा विभागाच्या बळकटीसाठी सरकारने १२९.२१ कोटींची तरतूद केली आहे. आपत्ती व्यवस्थापन क्षमता सुधारण्यासाठी विभागाला आधुनिक अग्निशामक उपकरणे, पाण्याचे टेंडर, टर्नटेबल शिडी आणि धोकादायक सामग्री प्रतिसाद वाहने उपलब्ध करून दिली जातील. वाळपई येथे अग्निशामक केंद्राचे उद्घाटन होणार असून, तुये येथील इलेक्ट्रॉनिक सिटी, डिचोली आणि वास्को येथील अग्निशामक केंद्रेही लवकरच पूर्ण केली जातील. राज्याच्या सुरक्षा यंत्रणेला बळकट करण्याच्या दिशेने अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या या तरतुदींमुळे पोलिसांची कार्यक्षमता वाढणार आहे.

# ओल्ड गोव्यातील बांधकामे तात्काळ थांबवण्याची खासदारांची मागणी

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २७ : दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी केंद्रीय पर्यटन आणि संस्कृती मंत्री यांना पत्र पाठवून जुन्या गोव्याच्या वारसा क्षेत्रातील सर्व अनधिकृत बांधकामे तातडीने आणि कायमस्वरूपी थांबवण्याची तसेच प्रसाद' योजनेअंतर्गत प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे. २७ मार्च २०२५ रोजी पाठवलेल्या या पत्रात खासदार फर्नांडिस यांनी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय)च्या अखत्यारीतील नो डेव्हलपमेंट बफर झोन'मध्ये मोठ्या प्रमाणावर उत्खनन आणि विकासकार्य सुरू असल्याचे अधोरेखित केले. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाच्या निकषांचे उल्लंघन होत असल्याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या विकासकामांमुळे वारसा प्रेमी, ग्रामस्थ आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप असून, त्यांना होणाऱ्या त्रासाबद्दल फर्नांडिस यांनी चिंता व्यक्त केली.

प्राथमिक तपासणीअंती हे समोर आले आहे की, प्रसाद' योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारच्या मदतीने या भागात नव्या इमारतींचे बांधकाम प्रस्तावित होते. मात्र, संरक्षित क्षेत्रांसाठी निश्चित नियमांची पायमल्ली होत असून, ऐतिहासिक स्मारके व सांस्कृतिक वारशाच्या जतनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे फर्नांडिस यांनी स्पष्ट केले. या क्षेत्राला नो डेव्हलपमेंट झोन' म्हणून मान्यता मिळालेली असून, तेथील पुरातत्त्वीय महत्त्व अनन्यसाधारण आहे. शतकानुशतके जुन्या ऐतिहासिक वस्तू आणि कलाकृती या भागात आढळतात. त्यामुळे ग्रामसभा आणि स्थानिक धार्मिक संस्थांनी ठराव संमत करून या प्रकल्पाविरोधात तीव्र आक्षेप घेतला आहे. या विकासकामांसाठी अवजड यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आल्याने वारसा स्थळांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक मौल्यवान पुरातत्त्वीय अवशेष नष्ट झाले असून, काही ठिकाणी ऐतिहासिक स्थळांचे विस्थापन झाले आहे. विशेषतः, उत्खननामुळे एक ४०० वर्षे जुनी संरक्षण भिंत उद्ध्वस्त करण्यात आली असून, उत्खनन केलेले साहित्य वाहून नेण्यासाठी बेकायदेशीर रस्ता तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप फर्नांडिस यांनी केला आहे. सध्या हे काम तात्पुरते थांबवण्यात आले असले तरी, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रकल्पावर कायमस्वरूपी बंदी घालावी, अशी मागणी फर्नांडिस यांनी केली आहे. पर्यटनाच्या विकासासाठी प्रसाद' योजना महत्त्वाची असली तरी ती ऐतिहासिक आणि पुरातत्त्वीय वारशासाठी धोकादायक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकल्प रद्द करण्याव्यतिरिक्त, उत्खनन केलेल्या साहित्याच्या वाहतुकीची चौकशी करून हरवलेले साहित्य मूळ ठिकाणी परत आणण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# रस्ते सुधारणा आणि ग्रीन कॉरिडॉर योजनेसाठी भरीव निधी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७** : गोव्यात खड्डेमय रस्त्यांमुळे प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेऊन, राज्य सरकारने रस्ते दुरुस्ती आणि देखभालीसाठी १२०८ कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच, प्रमुख महामार्गांवर ग्रीन कॉरिडॉर निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे. राज्यातील रस्त्यांचे सौंदर्यीकरण आणि सुरक्षितता वाढवण्यासाठी सरकारने रस्त्यांचे डांबरीकरण झाल्यानंतर पाच वर्षांसाठी खोदकामावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी २०२५–२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणात या नव्या धोरणाची घोषणा केली आहे.

महामार्गांवर ग्रीन कॉरिडॉर उभारण्यासाठी नवीन रस्ते अभियांत्रिकी आणि डिझाइन धोरण आखले जाईल. यामुळे भटक्या गुरांचा वावर रोखला जाईल,



रस्त्यांची सौंदर्यवृद्धी होईल तसेच प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित केली जाईल, असे सावंत यांनी सांगितले. राज्यात वारंवार रस्ते खोदल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय म्हणून सरकारने 'कॉमन युटिलिटी डक्ट' बांधण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे पाईपलाइनसाठी वेगवेगळ्या यंत्रणांकडून वारंवार रस्ते खोदण्याची गरज भासणार नाही आणि अपघातांची शक्यता कमी होईल.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अर्थसंकल्पात मात्र १००० कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. यावर्षी सार्वजनिक बांधकामांसाठी १९७६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून, मागील वर्षाच्या २९७६ कोटी रुपयांच्या तुलनेत हे कमी आहे.पाणीपुरवठा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने सरकारने सर्व प्रकारच्या पाण्याच्या टँकरसाठी अनिवार्य नोंदणी आणि रंग–कोडिंग प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, राज्यातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी विविध मतदारसंघांमध्ये १०२३.३५ कोटी रुपये खर्चून जलशुद्धीकरण प्रकल्प उभारले जाणार आहेत. याशिवाय, ५७७.०१ कोटी रुपयांचे पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.

राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सहभागी असलेल्या कंत्राटदारांना कमी व्याजदराने कर्ज मिळावे, यासाठी 'मुख्यमंत्री अर्थ सहाय्य योजना' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेमुळे कंत्राटदारांना निधीच्या कमतरतेमुळे येणाऱ्या अडचणींवर मात करता येणार आहे.राज्यातील विविध पूल आणि कल्व्हर्टच्या स्ट्रक्चरल ऑडिटची प्रक्रिया या वर्षी पूर्ण केली जाणार आहे. यासोबतच, सरकारी इमारतींचेही स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार असून, त्याआधारे आवश्यक पुनर्बांधणी आणि मजबुतीकरणाच्या उपाययोजना केल्या जातील, असे मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले. राज्यातील सर्व ऐतिहासिक वारसा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, सरकारी इमारतींच्या दृष्यमान सौंदर्यात सुधारणा करण्याच्या उद्देशाने सर्व सरकारी इमारतींना एकसमान रंग–कोडने रंगवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

शहरी भागातील वाढत्या उष्णतेच्या समस्येवर उपाय म्हणून उभ्या बागांचे प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. या पर्यावरणपूरक उपक्रमामुळे शहरी भागातील तापमान कमी होण्यास मदत होईल, असे अर्थसंकल्पीय प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.



# वेर्णा परिसरात फुलले कलिंगडचे मळे

## आणखी चालनेसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज : मजुरीचा खर्च ठरतोय मोठे आव्हान

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २७ : यंदा वेर्णा आणि परिसरातील शेतकऱ्यांना कलिंगडच्या उत्पादनात मोठे यश मिळाले असून, त्यामुळे गावात आनंदाचे वातावरण आहे. मात्र, कलिंगड शेतीला आणखी चालना मिळावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक मदत करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

शेजारच्या राज्यांमधून कलिंगडाच्या बियाण्यांची खरेदी करावी लागत असल्याने शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक भार पडत आहे. कृषी विभागाने या समस्येची दखल घेऊन अधिक योजनांची माहिती द्यावी आणि शेतकऱ्यांना मदत करावी, असे मत स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे. वेर्णा येथील कलिंगड उत्पादकांनी यावर्षीच्या चांगल्या उत्पादनाबद्दल समाधान व्यक्त केले. मात्र, मजुरीच्या वाढत्या खर्चामुळे त्यांना आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

वेर्णा, नागवा , माजोर्डा आणि उतोर्डा येथील अनेक शेतकरी आपल्या उपजीविकेसाठी कलिंगड शेतीवर अवलंबून आहेत. २०२० आणि २०२१ मध्ये एका दुर्मिळ रोगामुळे कलिंगड पिकाचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, यावर्षी परिस्थिती सुधारली आहे.

वेर्णा येथील शेतकरी डुमियान्हा मिनेझिस यांनी सांगितले की, यावर्षी कलिंगडचे उत्पन्न चांगले झाले असून, नफा मिळत आहे. मात्र, आम्हाला अजूनही बियाण्यांच्या किमतींबाबत झगडावे लागते. स्थानिक बियाणे उपलब्ध नसल्याने बहुतेक शेतकरी बेळगाव आणि अन्य शेजारील राज्यांमधून बियाणे घेत आहेत. मिनेझिस यांनी असेही सांगितले की, बेळगावमधील बियाण्यांमुळे चांगले उत्पादन मिळते, मात्र मजुरीचा खर्च मोठे आव्हान ठरत आहे.

धूळपे –वेर्णा येथील शेतकरी फ्लोरिना परेरा यांनी निदर्शनास आणले की, कलिंगडाच्या बियाण्यांचे छोटे पॅकेट सुमारे १,००० रुपयांना मिळते. जरी खर्च जास्त असला तरी यंदा उत्पन्न समाधानकारक आहे आणि मागील वर्षांच्या तुलनेत अधिक नफा मिळण्याची अपेक्षा आहे. क्लॅरिना मेंडेस यांनी अधिकाऱ्यांनी कलिंगड शेतीबाबत अधिक जागरूकता कार्यक्रम राबवावेत, अशी मागणी केली. त्या म्हणाल्या, पिकांची योग्य काळजी घेण्यासाठी अधिक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन आवश्यक आहे. वेर्णा येथे सध्या १०० हून अधिक शेतकरी कलिंगड उत्पादनात गुंतले आहेत. महामार्गालगत दररोज २५० ते ३०० कलिंगड विकले जात असून, स्थानिक आणि पर्यटक याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत आहेत.

शेतकऱ्यांनी सरकारकडे कलिंगड शेतीला चालना देण्यासाठी अधिक सहाय्य आणि योजनांची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. जर योग्य पाठबळ मिळाले, तर गोव्यातील कलिंगड उत्पादन अधिक वृद्धिंगत होऊ शकते, असे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.